महाराष्ट्र शासन

**शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी**

थिबा प्रासाद नजिक, रत्नागिरी-४१५ ६१२. (महाराष्ट्र) ☎ : ०२३५२-२२२२०३ / २२२४३५

Estd 1961 ईमेल : office.gpratnagiri@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : www.gpratnagiri.org

• AICTE Permanent ID : 1-455597101 • DTE Code : 3009 • MSBTE Code : 0013

जावक क्र.:- शातंर/भांडार/आंबा-विक्री /२०२४-२५/3423
दिनांक :- 21-12-24

## आंबा विक्री नोटीस २०२५

शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी संस्थेच्या आवारात असलेल्या कलमी, रायवळ, व पायरी आंबा फळांची विक्री करीता सिलबंद पाकीटात निविदा मागविण्यात येत आहे.

सदरहु आंबा फळे विकत घेण्याची इच्छा असणा-यांनी रु. २५००/- च्याक्रॉस चेकसह (अनामत रक्कम म्हणुन) मा. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी यांच्या नावे" आंबा फळे खरेदी निविदा २०२४ " असे लिफाफ यावर लिहुन आपले दरपत्रक दिनाक १५/०१/२०२५ पर्यंत दुपारी ०२.०० वाजेपर्यंत संस्थेच्या भांडार विभागात आणुन द्यावीत. त्याच दिवशी दुपारी ०४.०० वाजता निविदा पत्रक उघडण्यात येतील व ज्यांचा उच्चतम दर मंजुर होईल त्यांनी आपली रक्कम रोखीने त्याच दिवशी रोखपाल, शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी यांच्याकडे भरणा करावयाची आहे.

निविदा ना-मंजुर होणा-या ठेकेदारांची अनामत रक्कम( चेक ) त्याच दिवशी परत करण्यात येईल इतर अटी संस्थेच्या भांडार विभागात पहावयास मिळतील.

( डि. एम. शिंदे )
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी

प्रत :
1) विभाग प्रमुख संगणक विभाग, शा.त. रत्नागिरी संस्थेच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करणेकरिता
2) प्रबंधक, शा.त. रत्नागिरी मुख्य सूचना फलकावर प्रदर्शित करणेकरिता
3) रोखपाल, शा.त. रत्नागिरी पुढील कार्यवाहीकरिता

क्र. भां.५

सन २०२४-२५ या हंगामासाठी संस्थेच्या आवारातील आंबा फळे विक्रीसाठी निविदा मागविण्यात येत आहेत.

झाडांची जागा पुढील प्रमाणे

नविन इमारतीजवळ - ०१ व समोर - ०१, मुलींचे वसतीगृह कोपरा ०१, प्राचार्य बंगला ०२, कर्मशाळा - ०३, कार्यालय मागील गेट जवळ – ०२, वर्ग ४ शासकीय निवास स्थानासमोर ०१, सुरक्षा रक्षक चौकी जवळ - ०१

१) सन २०२५ मधील ३० जुन पर्यंतचा आंबा हंगाम संपेपर्यंतच आंबा फळे काढता येतील.
२) आंबा झाडाच्या देखभालकरीता जैविक फवारीही भांडार विभागातील कर्मचा-यांच्या देखरेखीखाली करण्यात यावी.
३) आंबा फळे सुटीचे दिवस वगळुन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व विहीत वेळेत स्वखर्चाने तोडुन न्यावयाची आहेत.
४) आंबा फळेतोडणेकरीता प्रशिक्षीत व्यक्तीयांचे कडुन काम करवुन घेणे. जेणे करुन अपघात, जोखमीचे प्रकार होणार नाहीत. जर अपघात , जोखमीचे प्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारीही ठेकेदाराची राहील संस्था त्यास जबाबदार राहणार नाही.
५) आंबा तोडण्याव्यतिरिक्त सदर झाडाचे कोणतेही नुकसान झाले तर रु. १५००/- अमानत मधुन रक्कम वसुल करण्यात येईल. तसेच आवारातील इतर झाडांचेही नुकसान होता कामा नये याची काळजी घेण्यात यावी.
६) ज्यांचा दर मंजुर होईल त्यांनी आपली रक्कम रोखीने त्याच दिवशी रोखपाल, शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी यांच्याकडे भरणा करावयाची आहे.
७) निविदा मंजुर करणे अथवा नाकारणे हया बाबतचे सर्व अधिकार प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी यांनी राखून ठेवले आहेत.

( डि. एम. शिंदे )
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी.



d:\gp\ratnagiri\mango.gpr\24-25\tender notice for mango selling.docx